भारत सरकार, गृह मंत्रालय, यांच्या *“Special Infrastructure Scheme (SIS), including construction of 250 Fortified Police Stations in LWE affected States”* या योजनेखाली महाराष्ट्र राज्यासाठी मंजूर २० *“Fortified Police Stations” (गडचिराली व गोंदिया या जिल्ह्यांमधील)* यांचे इमारत बांधकाम करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्र. एसआयएस-१११८/प्र.क्र.४४१/ पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक २८ ऑगस्ट २०१९.

वाचा :-

१) भारत सरकार, गृह मंत्रालय, एलडब्ल्युई विभाग, यांचे पत्र क्र. १८०१५/ ०२/ २०१८- एलडब्ल्युई-४, दिनांक ०६.०७.२०१८.
२) शासन पत्र, गृह विभाग, क्र. बैठक-१११७/ प्र.क्र.५४७/ पोल-७, दिनांक १०.०५.२०१८.
३) शासन पत्र, गृह विभाग, क्र. एसआयएस-१११८/प्र.क्र.४४१/ पोल-७, दिनांक ०७.१२.२०१८.
४) शासन पत्र, गृह विभाग, क्र. एसआयएस-१११८/प्र.क्र.४४१/ पोल-७, दिनांक १५.०७.२०१९.
५) शासन पत्र, गृह विभाग, क्र. एनएएक्स ०२१५/ प्र.क्र.६०/ विशा.१ब, दिनांक २०.०७.२०१९.
६) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं २१-ए/ १९५/ एसआयएस / १५१/ २०१७, दिनांक १५.०७.२०१९.
७) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं २१-ए/ १९५/ एसआयएस/ १५१/ २०१७, दिनांक २३.०७.२०१९.
८) म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांचे पत्र क्र. पीएचसी/ टीबी/ एसई (एचक्यू-२)/ पो.-ठाणे-इमारत-नक्षलग्रस्त-क्षेत्र/ २४०१/ २०१९, दिनांक २३.०७.२०१९.

<u>प्रस्तावना</u>.-

भारत सरकार, गृह मंत्रालय, यांनी *“Special Infrastructure Scheme (SIS), including construction of 250 Fortified Police Stations in LWE affected States”* या

योजनेखाली महाराष्ट्र राज्यासाठी एकूण २० *"Fortified Police Stations/ Sub-Police Stations"* (गडचिराली व गोंदिया या जिल्ह्यांमध्ये) यांच्या इमारतींचे बांधकाम मंजूर करण्यात आले आहे. उक्त २० पोलीस ठाणे इमारतींचे बांधकाम हे म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांच्यामार्फत करण्यात यावे, असे शासन पत्र, गृह विभाग, क्र. एसआयएस-१११८/ प्र.क्र.४४१/ पोल-७, दिनांक ०७.१२.२०१८, द्वारे पोलीस महासंचालक, म.रा., यांना कळविण्यात आले होते.

२. त्यानंतर शासन पत्र, गृह विभाग, क्र. एसआयएस-१११८/प्र.क्र.४४१/ पोल-७, दिनांक १५.०७.२०१९, द्वारे उक्त निर्णयाचा पुनरुच्चार करण्यात आला.

३. तथापि, यासंदर्भात मा. मुख्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली घटित करण्यात आलेल्या *"Committee for Integration and Co-ordination at State Government level"* या समितीच्या दिनांक २४.०७.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत चर्चा झाली व उक्त २० *"Fortified Police Stations"* यांचे बांधकाम हे पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली, यांच्यामार्फत करण्यात यावे, असे ठरले. त्या अनुसार शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>.-

भारत सरकार, गृह मंत्रालय, यांच्या *"Special Infrastructure Scheme (SIS), including construction of 250 Fortified Police Stations in LWE affected States"* या योजनेखाली महाराष्ट्र राज्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या २० *"Fortified Police Stations/ Sub-Police Stations" (गडचिराली व गोंदिया या जिल्ह्यांमध्ये)* यांचे इमारत बांधकाम पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली, यांच्यामार्फत करण्यात यावे.

२. हा शासन निर्णय, शासन पत्र, गृह विभाग, क्र. एसआयएस-१११८/ प्र.क्र.४४१/ पोल-७, दिनांक ०७.१२.२०१८ व दिनांक १५.०७.२०१९, यांचे अधिक्रमण करुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२८१२१९१७१७२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.08.28 12:25:07 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री, गृह (शहरे), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
८) व्यवस्थापकीय संचालक, म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., मुंबई.
९) अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती, म.रा., मुंबई.
१०) पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली, मुक्काम-नागपूर.
११) पोलीस अधीक्षक, गडचिराली.
१२) पोलीस अधीक्षक, गोंदिया.

प्रत-

१) कार्यासन अधिकारी (वि.शा.-१ब), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) कार्यासन अधिकारी (इमा.-२), सा.बां. विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) निवड फाईल (पोल-७).